VOL-01

Special Issue March 2018

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal

Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318



**Chief Editor**
Prof. Virag Gawande

Published By
**Aadhar Social Research Development Training Institute, Amravati.**

28) PERPLEX WOMAN OF 21ST CENTURY IN SHASHIDESHPANDE'S ......
Prof. Ashish Dadarao Deoorkar || 107

29) जागतिकीकरणात २१ व्या शतकातील महिलांपुढील आव्हाने-एक समाजशास्त्रीय अध्ययन
प्रा. डॉ. सुधा मु.खडके (कडू) || 110

30) जागतिकीकरणात आदिवासी कविता
प्रा. नितीन जगदिश टेकाम || 113

31) २१ व्या शतकातील भारतीय महिला व कर्तृत्व
प्रा. गजानन सोडनर || 116

32) जागतिकीकरणात संतानी केलेल्या समाज प्रबोधनाचे महत्व
लाभसेटवार एन.एस. || 120

33) जागतिकीकरणाचा भारतीय स्त्रियांवरील प्रभावाचा अभ्यास
प्रा. अरुण शेंडे || 124

34) जागतिक पर्यावरण
प्रा.डॉ उल्हास एन राठोड || 128

35) ग्रामीण विकासात शेती आधारित प्रक्रिया उद्योगांची भूमिका
प्रा. डॉ. नागोराव के. सोरे || 132

36) भारतीय अर्थव्यवस्था आणि जागतिकिकरण
प्रा. डॉ. दिपक भास्करराव कुटे || 136

37) जागतिकीकरण आणि भाष्कर चंदणशिव यांची कथा
प्रा. डॉ. अन्नपुर्णा अजाबराव चौधरी || 139

38) जागतिकीकरण आणि भारतावर वाढलेला विदेशी कर्जाचे ओझे
प्रा. डॉ. राधेशाम पी. चौधरी, जि. यवतमाळ || 143

39) SEASONAL VARIATION IN TEMPERATURE AND DISSOLVED OXYGEN IN RIVER KHUNI ...
SUJATA.H.SHENDE , DIST YAVATMAL, MAHARASHTRA. || 146

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

मांडणी झाल्याने शासनाची कार्यकक्षा व कार्यक्षमता कमी झाली आहे. अर्थसंकल्पात प्रचंड तुट आणि ती भरून काढण्यासाठी भरपूर कर्जे, असे दुष्टचक्र सुरू झाले.

१०) खाजगीकरण व निर्गुंतवणूक या नावाखाली सार्वजनिक क्षेत्रातील नफ्यातील उद्योगांची विक्री करून त्यातून जमा झालेला पैसा भांडवली खर्चासाठी वापरण्यात आला. याला काय म्हणावे?

भारतीय अर्थव्यवस्था आणि जागतिकीकरणाचा विचार करतांना वरील सर्व बाबींचा विचार व्हायला हवा. नविन आर्थिक धोरणाची दिशा आणि गति याबाबत खात्री करायला गेल्या २७ वर्षाचा काळ पुरेसा आहे. देशातील आर्थिक धुरीण व राज्यकर्ते यांना त्याची गरज वाटते का, हाच खरा अनुत्तरीत प्रश्न आहे.

➢संदर्भ सूचि :

१. डॉ. झामरे ग. ना., भारतिय अर्थव्यवस्था व पर्यावरण.

२. डॉ. खांदेवाले श्रीनीवास, समाजवादाच्या पहाटखुना.

३. प्रा. खटाळ बी. टी., भारतीय अर्थव्यवस्था.

४. विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेची संशोधन पत्रिका, अर्थमिमांसा.

५. 'अर्थबोधपत्रिका' भारतिय अर्थविज्ञानवर्धिनी

६. दैनिक लोकमत.

७. दैनिक लोकसत्ता.

८. दैनिक सकाळ.

❑❑❑

**37**

# जागतिकीकरण आणि भाष्कर चंदणशिव यांची कथा

प्रा. डॉ. अन्नपुर्णा अजाबराव चौधरी
श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा

*********

सद्याच्या स्थितीत जागतिकीकरणाची प्रक्रीया वेगाने सुरू होऊन जगातल्या कोणत्याही देशात जाऊन आपले उत्पादन करण्याचा व विकण्याचा अधिकार सर्व राष्ट्रांना मिळाला. यामध्ये विकसित देशांनी आर्थिक हित जोपासले असले तरी अविकसीत देशांना त्याची झळ सहन करावी लागते. पैसा हा पैशाकडे जात आहे. त्याबरोबरच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला अनेक अंगे प्राप्त झाली आहे. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या तीन संकल्पना एकमेकांच्या हातातहात घालून वावरत आहे. व्यवसायावरील शासनाचे नियंत्रण कमी करून खाजगी परवानगी देणे, कोणालाही कोणत्याही देशात जाऊन व्यापार करण्यास परवानगी देणे आणि सर्व राष्ट्रांशी मुक्तपणे व्यापार होत आहे. या धोरणामुळे जगात आर्थिकदृष्ट्या स्पर्धा वाढली. बाजारीकरण वाढले एकीकडे व्यापार स्वातंत्र्य मिळाले असले तरी दुसरीकडे सामान्यांचे, शेतकरी, शेतमजूर यांच्या जगण्यावर त्यांच्या इच्छा आकांक्षावर पाणी फेरल्या गेले. माणूस माणसांपासून दूर जाऊ लागला. गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी रूंदावल्या गेली. शोषण, भूक, विषमता या साऱ्या गोष्टी तळागाळातील माणसाच्या वाट्याला आल्या. कृषी संस्कृतीचे उद्ध्वस्तीकरण झाले. बेकारीचे प्रमाण वाढले. जागतिकीरणाची ही संकल्पना म्हणजे एक प्रकारे सामान्यांच्या वाट्याला दारिद्र्यात जीवन कंठणाऱ्यांना त्याच परिस्थितीत ठेवू पाहणारी ही व्यवस्था आहे. या यंत्रणेविषयी डॉ. अशोक पळवेकर म्हणतात, ''जागतिक

पातळीवरील महासत्तांनी त्यांच्या देशातील लोकांना अत्युच्च जीवनमान जगता यावे यासाठी इतरांच्या शोषणावर आधारित असलेली ही यंत्रणा जाणीवपूर्वक निर्माण केली.''

जागतिकीकरण हे उत्कर्षाच्या नावाखाली सामान्यांचे शोषण करू पाहणाऱ्या भांडवलशाहीचे नाव आहे. यामध्ये उद्योजक, धनिकांनी उद्योगधंदे काढून यंत्रव्यवस्थेच्या आधारावर श्रीमंतीच्या पायऱ्या गाठल्या परंतु तळागाळातील माणसे पोटासाठी वणवण भटकू लागली. म. सु. पाटील म्हणतात, ''कोणताही माणूस हा आचारानें, विचाराने, भाषेने, संस्कृतीने मूल्यदृष्टीने स्वत:च्या भूमीशी स्वाभाविकपणे जोडलेला असणे ही गोष्ट देशीपणात गृहीत आहे.'' ह्या प्रक्रियेत देशीपणाचे सूत्रच गारद झाली. शिवाय आचार, विचार, भाषा, संस्कृती ही मूल्ये तोडण्याची भूमिका या जागतिकीकरणाने पार पाडली. जागतिकीकरणाने काही प्रमाणात फायदे झाले असले तरीही तोटेही झाले. सुशिक्षितांना रोजगाराच्या संधी काही प्रमाणात मिळाल्या असल्या तरी दुसरीकडे काही आव्हाने सुद्धा निर्माण केली. देशांच्या परराष्ट्र धोरणांशी निरक्षर, अशिक्षित माणसाचा तसा संबंध नसल्याने त्यांच्या मजूरीचा प्रश्न निर्माण झाला. मुक्त अर्थव्यवस्थेचा खरा फायदा जगभरातील कंपन्यांना मिळाला. जगभरातील या कंपन्या भारतात आल्या व या कंपन्यांनी पावले खेड्यात रोवली. सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व साहित्यासारख्या अनेक क्षेत्रावर जागतिकीकरणाचा परिणाम झाला. या प्रक्रियेत खेड्यातील माणसाला पाहिजे तसे भवितव्य दिसत नाही. जागतिकीकरणाचा परिणाम साहित्यावर देखिल झाला भाष्कर चंदनशिव यांच्या कथेत हे पडसाद तीव्रपणे जाणवतात.

भाष्कर चंदनशिव हे मराठी कथालेखनाचा प्रांत समश्द्ध करणारे एक नाव आहे. 'जांभूळढव्ह', 'मरणकळा', 'अंगारमाती', 'नवी पाऊल', 'बिरडं' असे कथासंग्रह लिहून मराठी कथा वाङ्मयात त्यांनी मोलाची भर घातली. त्यांच्या चिंतनाचा मुख्य विषय म्हणजे ग्रामीण समाज आणि ग्रामीण इलाखा. त्यांचा जन्म खेड्यात झाला बालपण खेड्यात गेले. कोणताही लेखक ज्या काळात जन्मतो ज्या परिसरात राहतो त्या काळाचे परिसराचे दर्शन त्याच्या लेखनातून घडवत असतो. जगभर जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. ग्रामीण परिसराच्या सर्वांगिण अवनतीचे कारण शेतीच्या (आर्थिक) शोषणात व तज्जन्य विशेषात असल्याचे स्पष्ट मत लेखकाचे तयार झाले. भाष्कर चंदनशिव याबाबत स्वत: लिहितात, ''माझ्यातल्या शेतकऱ्याने आजवर शेतीत येत असलेल्या सालोसालच्या नुकसानीला दैव वा निसर्ग हे दोन घटकच जबाबदार धरले होते. पण नव्याने प्राप्त झालेल्या दृष्टीमुळे असे जाणवत चालले की शेतीच्या दुरावस्थेला इथली विशिष्ट अर्थव्यवस्था कारणीभूत आहे. शेती किफायतशीर होऊ न देणारे एक साळसूद षड्यंत्र या व्यवस्थेने निर्माण केलेले असून तिला शेतातील यंत्रोद्योगासाठी वापरायची आहे आणि भांडवलाचा संचय ग्रामीण भागात न होता यंत्रोद्योगाच्या शहरी परिसरात करायचा आहे. त्यामुळे ओली पडो की सुकी हार शेवटी शेतकऱ्यांचीच असा हा सारा मामला आहे हे सारे लक्षात येऊ लागले आणि ग्रामीण परिसरातील दारिद्र्य, दैन्य, अज्ञान, घाणेरडेपणा, परावलंबित्व, अंधश्रद्धा इ. विशेषांची मला एक नवी अर्थमूलक संगती लागू लागली''.

१९७२ नंतरच्या काळात ग्रामीण जीवनात वेगाने स्थित्यंतर घडून आले. दुष्काळ, शिक्षण, राजकारण, समाजकारण, अर्थकारण याबरोबरच सहकार, शासनामार्फत ग्रामीण भागात राबवल्या जाणाऱ्या योजना याचे पडसाद साहित्यातून उमटणे स्वाभाविक होते. भाष्कर चंदनशिव यांच्या 'अंगारमाती' या कथासंग्रहातील कथांतून प्रतित होतात. या कथांत सहकार आणि राजकारण यामुळे गरीब शेतकऱ्यांची ससेहोलपट अधोरेखित झाली. त्याबरोबरच शेतकऱ्यांचे सर्वतोपरी होणारे शोषण, साखर कारखान्यांच्या निमित्ताने ऊस उत्पादक व ऊस तोड कामगार यांच्या ताणतणावांचे सूक्ष्म चित्रण झाले.

'हिशोब' (अंगारमाती) या केथेत पदवी मिळवूनही बेकारी न संपणाऱ्या महिपती या तरूण मुलाची कथा आहे. पदवी नंतर तो सहा हजार रूपये खाजगी महाविद्यालयाला देणगी देऊन बी. एड. होतो पण कुठच त्याला नोकरी मिळत नाही. तो शेतीचे काम करतो परंतु आपला भाऊ एवढा शिकलेला

असून शेतीचे काम करतो याची सिरपतीला लाज वाटते. तो म्हणतो ''तुला ह्ये असं काम करतांना बघून कससच व्हतं बघ. तुला हेच करायचं व्हतं तर कशाला सिवसेनात आर्द आयुक्स घालविलस. एवढी ऊसाची लागणझाली की, तू हितं राहू नगस. कुठं बी जा. ह्ये काळ तोंड दाखवयाची आमलाच लाज वाटतेय'' आपल्या घरातील सर्व कष्ट करून खातात आणि आपणच कष्ट न करता खातो ही सल महिपतीला बोचते. महिपतीला आपल्या घरची परिस्थिती कळते. आपले आईवडील अज्ञानी—निरक्षर असल्यामुळेच मारवाड्याने गैरफायदा घेऊन गाव शिवारातल्या जमिनी बळकावल्या व मालक झाले. आलेलं पीक त्यांच्या पदरात ओतून मोकळं व्हायचं हेच त्यांच्या नशिबी. पिढ्यानपिढ्या हेच चालत आलेलं. महिपतीला राग येतो पण उपयोग नसतो. महिपतीचा बाप तात्या सानप त्याला सांगतो,'' तुझ ह्ये सगळ नव इच्यार खिनभर गुंडाळून ठीव. त्यानं पोट भरत नाय. हा समदा बापजाद्यांचा रिवाज हाय. दुनिया बदलली तरी आपल्याला बदलून भागायचं न्हाय. आपल्या जमिनीच्या सात बारावर त्याचीच मालकीखाण्यात नाव हाय. हे इसरू नगसं कुळात वाहीवाटीला आपून हाव. पण वाड्याच पहिलं देणं तसच बाकी राह्यलंय. तू शिकलाच फटकन नोकरीले पर भावाच्या घरावरून नांगर फिरवशील.'' महिपती आतल्या आत संतापाने धुमसतो परंतु त्यांच्या समोर काहीच पर्याय नसतो.

स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक विकासाचा एक मार्ग म्हणून सहकाराचे आगमन झाले. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी सहकारी संस्थांची निर्मिती झाली. सहकारी तत्वावरचे उद्योगधंदे हे विकासाच्या दिशेने नेणारे मार्ग होते. ग्रामीण भागातला सर्वात महत्वाचा उद्योग म्हणजे शेती. ग्रामीण औद्योगिकरणाचा पाया म्हणून साखर कारखान्याची सहकारी तत्वावर निर्मिती झाली. शेतकऱ्यांनी कोरडवाहू पिकांवर विसंबून न राहता बागायती शेतीकडे वळावं या हेतूने साखर कारखाने वाढले. सुरवातीला लहान मोठ्या शेतकऱ्यांच्या हातात पैसा खेळायला लागला. परंतु चित्र पालटत गेल. दुष्काळासारखं नैसर्गिक संकट तर होतच पण त्यातही अनेक मार्गाने शेतकऱ्यांची मुस्कटदाबी होत राहीली. 'तोडणी' या कथेत ऊस तोडणीसाठी कामगारांचा प्रश्न होता. बाहेरगावावरून कामगार आणले गेले. त्यांना शिधा देऊन जेवणाची व्यवस्था केली. सर्व मजूर मुकादमाच्या ताब्यात होते. त्यांचा हुकूम महत्वाचा असतो.

'इस्कुटा' या कथेत एका शेतकऱ्याच्या मुलीचे लग्न कबूल केल्याप्रमाणे हुंडा देऊ शकत नसल्याने पत्रिका छापून झाल्यावर मोडते कारण कारखान्याने ऊस तोडून नेलेलाच नसतो. तेव्हा पैसे कुठून येणार ? त्यामुळे मुलीचा बाप वेडा होतो व आई विहिरीत उडी घेते. कारखान्यावर ऊस उत्पादक जमा होत होते पण चेअरमन—संचालकांच्या भेटी होत नव्हत्या तीन माणसं कारखान्यापुढे आमरण उपोषणाला बसली होती. कारण त्यांना हवा होता घाम गाळून पिकवलेल्या उसाचा पैसा. तात्या सानप मात्र वेड्यासारखा रडत सुटतो. आपल्या व्यथा मांडतो पण कुणाच्याच हातात काहीही नसतं. 'कोळसं' ही कथाही ऊस उत्पादकांची करून कहाणी स्पष्ट करते. कारखान्यावर ऊस पोचवणारे ट्रक ड्रायव्हर्स आणि त्याचे साथीदार ऊस उत्पादकांची पिळवणूक करतात. जळक्या ऊसाला तोडून नेलं जात होत. त्यामुळे तात्या कुणाचं तरी ऐकून स्वत:चा ऊस जाळतो पण याप्रकरणाची चौकशी होते व पोलीसांना देण्यासाठी त्याच्याकडे पैसा नसतो. पंचनाम्यात तात्या सानपाने ऊस जाळल्याचे स्पष्ट लिहिले जाते. 'नवी हत्यारं' या कथेत ऊस उत्पादक शेतकऱ्याची स्थिती व मानसिकता अधोरेखित झाली. 'सडणी' या कथेत शेतकरी आंदोलनाची पार्श्वभूमी आहे. येवला, नांदगाव यासारख्या ठिकाणी कांद्याच्या मोठ्या बाजारपेठा आहेत त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील शेतकरी बिनभरवशाचा आहे. जेव्हा पीक होते तेव्हा बाजारभाव मंदावतात. व्यापारी—अडते शेतकऱ्यांची कोंडी करतात. कांद्यासारखे पीक जर जास्तकाळ ठेवले तर सडण्याची शक्यता असते शिवाय दूर नेऊन विकायचा म्हटले तर ट्रक, ट्रॅक्टरवाल्यांनी भाव वाढविलेले असते. ते शेतकऱ्याला परवडणारे नसते. बैलगाडीने न्यावे तर आलेल्या पैशानं बैलांचा चारा होतो उरत काहीच नाही अशी परिस्थिती निर्माण होते. 'पोस्टर' या कथेत साखर कारखान्याने जसा नवा उद्योग निर्माण केला तसेच काही प्रश्नही निर्माण केले. साखर कारखाना हे आर्थिक सत्तेचे केंद्र

बनलं त्यावर आपली हुकुमत असावी असं राजकारणी माणसाला वाटणं साहाजिक होतं. परंतु त्यात सामान्य माणसं भरडून निघत होती. 'आताडी' या कथेत भीषण दुष्काळामुळे माणसाचे जगणे कठीण झालेले आहे. ही जाणीव या कथेने करून दिली. 'लाल चिखल' मधील आबा, रकमा, बापू याची अवस्था टमाट्याच्या अतिरिक्त उत्पादनामुळे अशीच होते. बाजारात नेऊन टमाटे विकले तर दोन पैसे अधिक मिळतील असे आबाला वाटते. पण बाजारात आल्यावर लक्षात येते की, जिकडे तिकडे टमाटेच टमाटे विक्रीला आले. सुरवातीला आबा दोन रूपये किलो भाव लावतो परंतु टमाटे घेणारे चार आणे किलोचा भाव मागतात त्यामुळे नैराश्य, आणि संताप यामुळे आबा टमाटे खाली रिचवतो व सगळीकडे लालचिखल होतो. 'नवी हत्यार', विळखा या कथांत शेतकरी—संचालक, कर्मचारी यांची वर्दळ आणि गर्दी दिसते.या कथेत सामान्य शेतकरी निराश होतांना दिसतो.

**सारांश —**

भाष्कर चंदनशिव यांच्या कथा प्रामुख्याने ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. निसर्गाचा प्रकोप, वैराण उजाडपण यांच्या जोडीने बागायती शेतीचे झालेले प्रयत्न ग्रामीण माणसाच्या दृष्टीने कसे निष्फळ ठरते हे या कथामधून त्यांनी सांगितले.जागतिकीकरणाच्या स्पर्धेत सामान्य माणसांचे अस्तित्व भरडून निघाल्याची जाणिव भाष्कर चंदनशीव यांची कथा करून देते. निसर्गाचा कोप, दुष्काळ, बेकारी, निराशा या सारख्या अनेक प्रश्नांनी मानवी जनजीवन ढवळून निघाल्याची जाणीव भाष्कर चंदनशिव यांच्या कथेने दिली. तसेच जागतिकीकरणाच्या वावटळीत ग्रामीण भागाला व शेतकऱ्याला पाहिजे तसे उज्ज्वल भवितव्य नाही हे या कथेतून चित्रित झाले आहे. जागतिकीकरणाने सर्वच क्षेत्रामध्ये आपली पावलं रोवली असल्याचे या कथांमधून स्पष्ट होते. त्यामुळे सामान्य माणसाचा कोणताही व्यवसाय तोट्यातच जाणार ? त्यामुळे दुर्बल घटकांनी कसे जगावे?असे प्रश्न आवासून उभे आहेत. ग्रामीण भागातील राजकारण, समाजकारण, दांभिकता या प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत असल्याचे या कथा वाचून जाणवते.

**संदर्भग्रंथ —**


- डॉ. अशोक पळवेकर : ''जागतिकीकरण : समाज आणि सांस्कृतीक पर्यावरण'', उर्जा श्रमिक मुखपत्र स्मरणिका, नागपूर २००७ पृ. १५३
- म. सु. पाटील : '' साहित्याचे सामाजिक आणि सांस्कृतीक अनुबंध'', पद्मगंधा प्रकाशन श्रीरामपूर २००१ पृ. १९२
- डॉ. वासुदेव मुलाटे : ग्रामीण साहित्य चिंतन आणि चर्चा, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद
- डॉ. वासुदेव मुलाटे : ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद
- डॉ. नागनाथ कोत्तापल्ले : ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद तृतीय आवृत्ती


❑❑❑